शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २८ । अंक ३१२ । शुक्रवार, दि.१७ जुलै २०२६ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## तृणमूलच्या आणखी एका खासदाराचा राजीनामा

**कोलकाता ।** माजी मुख्यमंत्री, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना आणखी एक धक्का बसला आहे. अभिनेत्री ते राजकीय नेत्या झालेल्या पश्चिम बंगालमधील टीएमसीच्या राज्यसभा खासदार कोयल मलिक यांनी खासदारकीचा राजीनामा दिला आहे. खासदारकीचा राजीनामा देणाऱ्या त्या चौथ्या खासदार आहेत. कोयल मलिक यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी त्यांचा राजीनामा राज्यसभा अध्यक्षांकडे सोपवला आहे. त्यांच्या राजीनाम्याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

## सामना चित्रपटाचे विशेष प्रदर्शन

**मुंबई ।** मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते दिवंगत निळू फुले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि सामना चित्रपटाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे सामना या चित्रपटाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, १८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथील तिसऱ्या मजल्यावरील लघुनाट्यगृहात हा कार्यक्रम होईल.

## संपादकीय

### प्रधान सेवकांचे मौन, की उत्तरदायित्वाचा अपहार?

अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या दानपेटीतून झालेल्या कथित आर्थिक घोटाळ्याला आणि देणगी चोरीच्या धक्कादायक प्रकरणाला आता महिना उलटून गेला आहे. मात्र, या प्रकरणावरून सुरू असलेले राजकीय आणि सामाजिक वादंग शांत होण्याचे नाव घेत नाही. पाचशे वर्षांच्या प्रदीर्घ आणि ऐतिहासिक संघर्षानंतर, तसेच कोट्यवधी हिंदूंच्या अथांग श्रद्धेतून साकारलेल्या भव्य राम मंदिराच्या पवित्र वास्तूला अशा आर्थिक गैरव्यवहारामुळे डाग लागावा, ही समस्त देशवासीयांसाठी अत्यंत वेदनादायी आणि लज्जास्पद बाब आहे. या चोरी प्रकरणात आतापर्यंत अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या असून, त्याचे तीव्र पडसाद उमटत आहेत. रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत आपापल्या पदांचे राजीनामे दिले आहेत, तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयानेही या संपूर्ण प्रकरणात स्वतः लक्ष घालत कायदेशीर चाकोरीतून चौकशी करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही या संवेदनशील मुद्यावर आपली तीव्र चिंता व्यक्त करत संपूर्ण पारदर्शकतेची आग्रही मागणी केली आहे. परंतु, संपूर्ण देश ज्या अत्यंत गंभीर विषयाकडे डोळे लावून बसला आहे, त्यावरून सत्ताधाऱ्यांची बेजबाबदार विधाने आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर अद्याप बाळगलेले मौन मात्र पूर्णपणे अनाकलनीय आणि तितकेच चिंताजनक आहे. या संपूर्ण चोरीच्या पार्श्वभूमीवर राम मंदिर ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंदगिरी महाराज यांनी काही अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्टी सांगितल्या. काही प्रसारमाध्यमांमध्ये १४ कोटी रुपयांच्या चोरीचा मोठा दावा केला जात असला, तरी प्राथमिक खात्यांच्या आणि ऑडिटच्या पडताळणीनुसार ही चोरी सुमारे तीन कोटी रुपयांच्या आसपास झाली असल्याचा अंदाज त्यांनी वर्तवला आहे. मात्र, भ्रष्टाचाराचा आकडा तीन कोटींचा असो की यापेक्षा अधिक, प्रभू श्रीरामाच्या चरणी भक्तांनी अर्पण केलेल्या पवित्र धनाचा झालेला हा अपहार आहे. गोविंदगिरी महाराजांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ही दुर्दैवी घटना म्हणजे प्रभू श्रीराम चरणी केलेले एक महापाप पान २ वर »

## जगन्नाथ रथयात्रेत चेंगराचेंगरी

### दोन भाविकांचा मृत्यू; २०० जण जखमी



**पुरी ।** ओडिशामधील पुरी येथील जगप्रसिद्ध असलेल्या जगन्नाथ रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी झाल्याची घटना घडली. गुरुवारी घडलेल्या या घटनेत सुमारे २०० भाविक जखमी झाले, तर त्यापैकी दोन भाविकाचा मृत्यू झाला आहे.

भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांचे रथ ओढताना पाहण्यासाठी भाविकांचा जनसागर लोटला होता. चेंगराचेंगरी दरम्यान दोन भाविकाचा श्वास कोंडला आणि त्याची प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने पुरी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्या भाविकाचा मृत्यू झाला. गर्दीमुळे प्रचंड कोंडी झाली आणि इतर अनेक भाविकही जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

यात सुमारे२०० लोक जखमी झाल्याचे समजते, जगन्नाथ रथयात्रा हा भारतातील सर्वात मोठ्या धार्मिक उत्सवांपैकी एक असून, दरवर्षी देशभरातून आणि परदेशातून लाखो भाविक येथे येतात. त्यामुळे खबरदारी घेतली जाते. पण, भाविकांची संख्या दरवर्षी प्रचंड असते. यावेळीदेखील देशभरातील भाविकांनी याठिकाणी गर्दी केली आहे. परंतु रथ यात्रेदरम्यान गर्दी अनियंत्रित झाल्याने मोठी चेंगराचेंगरी झाली. यातच अनेकांचा श्वास कोंडला गेला.

# 'वर्षा'वर भेट : नाराजीचा स्फोट!

## राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत कलह समोर

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीए सोबत जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले असतानाच दुसरीकडे या संबधीच्या राजकीय घडामोडीवरून अजित पवार गटातील अंतर्गत वाद समोर आला आहे. प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली भेट, त्यावेळी तिथे शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांची असलेली उपस्थिती यावरून अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी तटकरे यांना सुनावल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

सूत्रांच्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी देवगिरी निवासस्थानी झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीची बैठकीत



सुनेत्रा पवार यांनी तटकरे यांना मुख्यमंत्र्यांची परस्पर भेट घेतल्यावरून फैलावर घेतल्याचे समजते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीबाबत आपल्याला आधी माहिती का देण्यात आली नाही, असा सवाल करत सुनेत्रा पवार यांनी तटकरे यांच्याकडे नाराजी व्यक्त केल्याचे समजते.

संसदेत मांडल्या जाणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरील चर्चा तसेच राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर जयंत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांची घेतलेली भेट महत्वाची मानली जात आहे. मात्र त्याचवेळी तटकरे आणि प्रफुल पटेलही तिथे उपस्थित असल्याने दोन्ही राष्ट्रवादीच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चा अचानक सुरू झाल्या आहेत. मात्र कोणतीही पूर्वकल्पना न देता तटकरे, पटेल वर्षा वर गेल्याने सुनेत्रा पवार यांनी कोअर कमिटीच्या बैठकीत याबद्दल स्पष्ट शब्दात आपली नाराजी व्यक्त केली. त्यावर जयंत पाटील हे मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर कोणताही गैरसमज होऊ नये म्हणून आम्हीही त्या बैठकीला उपस्थित राहिलो, असे स्पष्टीकरण तटकरे यांनी बैठकीत दिल्याचे सूत्रांनी सांगितले. तरीही, ही बाब मला आधी सांगणे आवश्यक वाटले नाही का? असा प्रश्न सुनेत्रा पवार यांनी तटकरेंना केल्याचे सांगण्यात आले. कोअर कमिटीच्या बैठकीला पार्थ पवार, मंत्री छगन भुजबळ, हसन मुश्रीफ यांच्यासह काही वरिष्ठ नेते उपस्थित होते. या बैठकीत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त नियोजित कार्यक्रमाची तयारी, शरद पवार यांच्या पक्षाकडून एनडीएला देण्यात येणाऱ्या संभाव्य पाठिंब्याबाबत तसेच मंगळवारी रात्री मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मवर्षाफ निवासस्थानी झालेल्या बैठकीबाबत चर्चा करण्यात आली.

### सुनील तटकरेंचे स्पष्टीकरण

दरम्यान, कोअर कमिटीच्या बैठकीच्या बातम्या समोर येताच तटकरे यांनी गुरुवारी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना मतभेदांच्या चर्चेचे खंडन केले. अजितदादांसोबत जसे माझे जसे स्नेहाचे संबंध होते, तसेच सुनेत्रावहिनींसोबतही आहेत. आमच्यात कोणताही गैरसमज किंवा नाराजी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### नव्याने विलीनीकरणाची चर्चा नाही

अजितदादा असताना विलिनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यापर्यंत पोहचली होती. पण दुर्दैवाने दादांच्या निधनानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळाला. शरद पवारांच्या पक्षातील नेत्यांनीही विलिनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम असल्याचे म्हटले आहे. आता नव्याने ती चर्चा सुरू झालेली नाही, असे तटकरेंनी यावेळी स्पष्ट केले.

## विद्यार्थ्यांवर ताण का?

### त्रिभाषा धोरणावर सर्वोच्च न्यायालय भडकले

**नवी दिल्ली ।** इयत्ता नववीपासून तीन भाषा धोरण लागू करु नका, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने सीबीएसई बोर्डाला सुनावले आहे. आता तिसरी भाषा लागू करणे म्हणजे बोर्ड परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांवर हा विनाकारण ताण टाकणारा निर्णय आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी सांगितले.



सीबीएसईच्या तिसरी भाषा लागू करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात आहे.तामिळनाडू सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. तामिळनाडू सरकारकडून त्रिभाषा धोरणाला विरोध केला जात आहे. त्यामुळेच नवोदय विद्यालयांमध्येही हे लागू करु नये म्हणून विरोध होत आहे. या विद्यालयांमध्ये तीन भाषा धोरण आधीपासूनच लागू आहे. मद्रास न्यायालयाने प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालय सुरू करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्याला आव्हान दिले गेले असून, सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने त्रिभाषा सूत्रांवरूनही सुनावले.

यात राज्यातील भाषा शिकवली गेली पाहिजे. इंग्रजी भाषा शिकवली गेली पाहिजे आणि तिसरी भाषा म्हणून इतर कुठलीही भाषा असू शकते. यात कुठेही असे म्हटले गेलेले नाही की, तिसरी भाषा हिंदीच असली पाहिजे, असे न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या. वकील जी. प्रियदर्शिनी यांनी न्यायालयात सांगितले की, राष्ट्रीय शिक्षण धोरणात स्पष्टपणे म्हटले गेले आहे की, कोणत्याही राज्यावर कोणतीही भाषा लादली जाऊ शकत नाही. त्यावर न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, तुम्हाला हिंदी भाषा नकोय, पण जर संस्कृत असेल, तर काय अडचण आहे? सहाव्या वर्गापासूनच तिसरी भाषा शिकवली जावी तामिळनाडू सरकारच्या वकिलांनी सांगितले की, तिसरी भाषा इयत्ता ९वी पासू लागू केली जात आहे.

## सोनम वांगचुक यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवा!

**नवी दिल्ली ।** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी चिंता व्यक्त केली. प्रत्येक नागरिकाचे जीवन अत्यंत मौल्यवान आणि अमूल्य आहे, त्यामुळे त्याची सुरक्षा करण्यासाठी सरकारने सर्व शक्य पावले उचलली पाहिजेत, असे स्पष्ट निर्देश दिल्ली हायकोर्टाने केंद्र सरकारला दिले. तसेच सरकारी डॉक्टरांनी दररोज वांगचुक यांची वैद्यकीय चाचणी करून त्यांच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवावे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.



उच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला आदेश

गेल्या १९ दिवसांपासून सोनम वांगचुक दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर आमरण उपोषणाला बसले आहेत. नीट परीक्षेतील कथित घोटाळ्याविरोधात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टी गेल्या २५ दिवसांहून अधिक काळ आंदोलन करत आहे. २८ जूनला सोनम वांगचुक या आंदोलनात सामील झाले आणि तेव्हापासून ते उपोषणावर बसले आहेत. त्यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त करणाऱ्या एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुख्य न्यायाधीश डी.के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या खंडपीठाने हा महत्त्वाचा आदेश दिला.

सुनावणी दरम्यान केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले की, सोनम वांगचुक यांची दररोज वैद्यकीय तपासणी केली जात आहे.

## हर्षवर्धन सपकाळ यांची फडणवीसांवर टीका

**मुंबई ।** राज्य सरकारने जाहीर केलेली ४८ हजार कोटींची वीजबिल माफी ही शेतकऱ्यांच्या हितासाठी नसून उद्योगपती गौतम अदानी यांच्या फायद्यासाठी असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी येथे केला. राज्य वीज मंडळाच्या चारही कंपन्यांचे खासगीकरण करून त्या कंपन्या अदानीला आंदण द्यायच्या आहेत, असा दावाही त्यांनी केला. सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा केली असली तरी तिची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. त्यानंतर वीजबिल माफीची घोषणा करण्यात आली.

## सरकारविरोधात काँग्रेसने रणशिंग फुंकले

**नवी दिल्ली ।** लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी परदेश दौऱ्यावर होते. राहुल गांधी हे भारतात परतताच काँग्रेसच्या प्रमुख आणि ज्येष्ठ नेत्यांची एक बैठक झाली. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत नीट परीक्षा, इथेनॉल आणि राम मंदिर दान चोरी प्रकरणी सखोल चर्चा झाल्याचे म्हटले जात आहे.



काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांची झाली बैठक

शिक्षण व्यवस्थेतील अनियमितता, पेपरफुटी, राम मंदिरातील दान चोरी, इथेनॉल संबंधित प्रश्न आणि इतर अनेक मुद्द्यांवर संसदेच्या आगामी पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारकडून जबाब मागण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला आहे. परराष्ट्र धोरण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांशी संबंधित मुद्देही पक्ष अधोरेखित करेल, असे पक्षाने म्हटले आहे.

पक्षाची संसदीय रणनीती निश्चित करण्यासाठी सोनिया गांधी यांच्या १०, जनपथ येथील निवासस्थानी एक बैठक झाली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, संघटन महासचिव के.सी. वेणुगोपाल आणि राज्यसभेतील काँग्रेसचे मुख्य प्रतोद जयराम रमेश यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते काँग्रेस पावसाळी अधिवेशनात सरकारकडून उत्तरे मागणार आहेत.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2450 |
| नवती (२) | : 1650 |

## मिरकिली




## एमपीएससीची परीक्षा यावर्षी ऑफलाईनच!

**मुंबई ।** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा संगणक आधारित अर्थात ऑनलाईन घेण्याच्या निर्णयाविरोधात उमेदवारांमध्ये असलेली तीव्र नाराजी लक्षात घेऊन ऑनलाईन परीक्षा प्रणाली ऑगस्ट २०२७ पासून टप्प्याटप्प्याने लागू करण्याचे निर्देश देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीला दिले आहेत. या निर्णयाने लाखो उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.

एमपीएससीने काही दिवसांपूर्वी संयुक्त पूर्व परीक्षा गट क ऑनलाईन घेण्याचा निर्णय घेतला होता. ही परीक्षा एकापेक्षा अधिक सत्रांमध्ये आयोजित करण्यात येणार होती. तसेच प्रत्येक सत्रासाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका दिली जाणार होती. सर्व सत्रांतील प्रश्नपत्रिकांचे स्वरूप आणि काठिण्यता स्तर विचारात घेऊन परीक्षेअंती गुणांचे समानीकरण केले जाणार होते. या निर्णयाविरोधात परीक्षार्थी, उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय रद्द करून ती ऑफलाईन घेण्याची मागणी केली होती.

## शिंदेंची मोफत साडी योजना गुंडाळली

### वस्त्रोद्योग विभागाचा शासन निर्णय जारी

**मुंबई ।** तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी सुरु केलेली मोफत साडीची योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुंडाळली आहे. वस्त्रोद्योग विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला.

वस्त्रोद्योग विभागाच्या विविध योजना, विविध घटकांना दिले जाणारे अर्थसहाय्य, प्रस्तावित योजनांचा आर्थिक भार आणि इतर दायित्वे यांचा विचार करता कॅप्टिव्ह मार्केट योजना पुढील आर्थिक वर्षात सुरु ठेवणे संयुक्तिक दिसत नसल्याने मोफत साडीची योजना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून बंद करण्यात येत असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. शिंदेंच्या नेतृत्वातील सरकारने



आनंदाचा शिधा, मुख्यमंत्री अन्नपूर्णा, वयोश्री, जेष्ठ नागरिक तीर्थाटन, शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा अशा अनेक लोकप्रिय योजना जाहीर केल्या होत्या. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व योजना एकापाठोपाठ बंद केल्या. आता अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांसाठी सणाच्यावेळी दरवर्षी एक साडी देण्याची योजनाही बासनात गुंडाळण्यात आली आहे.

वस्त्रोद्योग विभागाने २ जून २०२३ रोजी एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले होते. या धोरणानुसार राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना वस्त्रोद्योग विभागातर्फे यंत्रमागावर विणलेली प्रति कुटुंब एका साडीचे मोफत वाटप करण्याची योजना नोव्हेंबर २०२३ मध्ये सुरु करण्यात आली . योजनेच्या अंतर्गत राज्य यंत्रमाग महामंडळाने १ साडी ३५५ रुपयांना खरेदी केली. तसेच या योजनेसाठी साड्यांचे उत्पादन, वाहतूक, जाहीरात, प्रसिद्धी, साठवणूक, हमालीसाठी येणारा खर्च महामंडळाला राज्य सरकारकडून देण्यात आला. ही योजना २०२३ ते २०२८ अशा पाच वर्षांसाठी निश्चित करण्यात आली होती. मात्र, योजेनचा कालावधी पूर्ण होण्याआधीच ती बंद करण्यात आली.

## ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना निमंत्रण

**मुंबई ।** अयोध्येतील श्रीराम मंदिरासाठी भाविकांनी दिलेल्या देणगीची लूट झाल्याच्या निषेधार्थ शिवसेना उबाठा गटाने छेडलेल्या रामरक्षा आंदोलनाचा पुढचा टप्पा उद्या, शनिवारी नागपूर येथे पार पडत आहे. यानिमित्ताने रामभक्तांना शुभेच्छा देण्यासाठी आंदोलनात सहभागी होण्यासाठी ठाकरे गटाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निमंत्रण दिले आहे. पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी यासंदर्भात फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. श्रीराम मंदिरातील भक्तांनी दिलेल्या दानाची चोरी झाल्याचे उघड झाल्यानंतर ठाकरे गटाने महाआरती आणि रामरक्षा आंदोलन सुरु केले. ५ जुलै रोजी दादर येथे आंदोलन केल्यानंतर आता १८ जुलैला उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत संध्याकाळी साडेचार वाजता नागपूरच्या राम मंदिरात आंदोलन होत आहे. हा कार्यक्रम नागपूरमध्ये होत असल्याने रामरक्षा उपक्रमात आवर्जून सहभागी होऊन रामभक्तांना शुभेच्छा द्याव्यात, असे राऊत यांनी पत्रात म्हटले आहे. आपण एक प्रखर रामभक्त आणि कडवट हिंदुत्ववादी आहात. अयोध्येतील राम जन्मभूमी मुक्त करण्याच्या आंदोलनात सहभागी झाल्याचे आपण नेहमी सांगता, असे खा.संजय राऊत म्हणाले.